**ठळक बातम्या**

- राज्यात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत विक्रमी ७१ टक्के पेरणी
- विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निलंबनात कपात
- नीती आयोगाचं संपूर्णता अभियान देशभरात सुरू, राज्यातल्या २७ तालुक्यांचा समावेश
- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स पहिल्यांदाच ८० हजाराच्या उच्चांकी पातळीवर बंद

  **आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकून मायदेशी परतलेल्या भारतीय संघाची मुंबईत विजयी मिरवणूक

**<><><><><>**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत विक्रमी ७१ टक्के पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत १ लाख १० हजार हेक्टरची वाढ झाल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत दिली. आतापर्यंत १०१ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. गेल्यावर्षीच्या ३ जुलैच्या तुलनेत हे प्रमाण २० लाख हेक्टरनं वाढलं आहे, असं त्यांनी सांगितलं. राज्यात कुठेही खतं आणि बियाणांचा तुटवडा नाही. नियोजनापेक्षा अधिक खतं आणि बियाणं उपलब्ध आहेत, असं ते म्हणाले. खतं आणि बियाणांच्या संदर्भात विविध तक्रारी आल्यानंतर whatsapp हेल्पलाइन सुरू केली. आतापर्यंत ६२ फौजदारी गुन्हे दाखल झाले असून, २७८ अधिकारी कर्मचाऱ्यांचं निलंबन केलं आहे. याशिवाय १ हजारांहून अधिक ठिकाणी विक्री बंद करण्याचे आदेश दिल्याचं कृषीमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या दिवाळखोर सहकारी पतसंस्था आणि बँकांनी बुडवलेल्या ठेवीदारांचे किमान एक लाख रुपये परत मिळण्यासाठी स्वतंत्र निधी उभारला जात आहे, अशी माहिती सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आज विधानसभेत दिली.

मुंबईतल्या लोकमान्य टिळक रुग्णालय अर्थात सायन रुग्णालयात नव्यानं इमारती बांधून त्यात वाढीव रुग्ण खाटा, परिचारिका निवास, बाह्य रुग्ण विभाग यासह अनेक सुविधा दिल्या जातील अशी माहिती प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी दिली. पहिल्या टप्प्यात ६१६ कोटी रूपये खर्चून डिसेंबर २०२५ पर्यंत पहिली इमारत, तर दुसऱ्या टप्प्यात १५०७ कोटी रूपये खर्चून दुसरी इमारत उभारली जाणार आहे, असं सामंत म्हणाले.

<><><><><>

राज्यात शासन अनुदानित सुमारे साडे अकरा हजार ग्रंथालयं असून वाचन चळवळीला चालना देण्यासाठी नव्यानं सहा ते सात हजार ग्रंथालयं सुरु केली जातील, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. यानुसार ३ हजार लोकसंख्येच्या प्रत्येक गावात तसंच ५०० लोकसंख्येच्या आदिवासी बहुल गावात ग्रंथालय अनिवार्य होणार आहे. ग्रंथालयांच्या सध्याच्या अनुदानात वाढ केली जाईल तसंच ग्रंथालयांचा दर्जा वाढवून देण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित करून ग्रंथालयांकडून ऑनलाईन माहिती मागवली जाईल, असं ते म्हणाले.

आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी केलेलं निलंबन तीन दिवसांवर आणण्याचा प्रस्ताव विधानपरिषदेनं आज एकमतानं मंजूर केला. संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा प्रस्ताव मांडला. तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

राज्य पोलीस दलात कंत्राटी पद्धतीनं भरलेली पदं ही तांत्रिक आहेत. ही तात्पुरती भरती ११ महिन्यांसाठी करत असतानाच, दुसरीकडे ८१ पदांच्या नियमित भरतीच्या प्रक्रियेला मान्यता दिलेली आहे, उर्वरित पदांच्या भरतीची प्रक्रियाही सुरू आहे, असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतली घरं विकण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीनं दिलं जाणार असून अर्ज केल्यानंतर ४५ दिवसांत प्रमाणपत्र मिळेल, असं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सांगितलं. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतली घरं विकण्यासाठीच्या अनेक अटी शिथिल केल्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

विधानपरिषदेतल्या निवृत्त सदस्यांना आज निरोप देण्यात आला. वरिष्ठ सभागृहाचा नावलौकिक वाढवण्याचं काम या सदस्यांनी केल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी काढले. येणाऱ्या सदस्यांना या सदस्यांचं काम कामकाजाच्या नोंदीद्वारे अभ्यासता येईल आणि यातून प्रेरणा मिळेल असंही मुख्यमंत्री म्हणाले. विधानपरिषदेतले विलास पोतनीस, निरंजन डावखरे, किशोर दराडे, कपिल  पाटील, अनिल परब, महादेव जानकर, मनिषा कायंदे, विजय ऊर्फ भाई गिरकर, बाबाजानी दुर्राणी, निलय नाईक, रमेश पाटील, रामराव पाटील, मिर्झा वजाहत, प्रज्ञा सातव, जयंत पाटील या सदस्यांना निरोप देण्यात आला.

बेस्टच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सध्याच्या पदांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पदभरती केली जाईल, असं उद्योगमंत्री उदय सामंत यांनी. पदभर्तीसाठी आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

नीती आयोगाचं संपूर्णता अभियान आजपासून देशभरात सुरू झालं. ४ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान देशातल्या ५०० तालुक्यांत हे अभियान राबवलं जाणार आहे. या अभियानामार्फत गरोदर मातांची तपासणी, उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी,

गरोदर मातांना पोषण आहार, मृदा आरोग्य पत्रिका आणि स्वयंसहाय्यता गटांना खेळतं भांडवल देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात अमरावती, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, जालना, नंदुरबार, हिंगोली, नाशिक, धाराशिव, पालघर, सोलापूर, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमधल्या, एकूण २७ तालुक्यांचा या अभियानात समावेश झाला आहे.

**यवतमाळ** जिल्ह्यातल्या झरी जामणी या आकांक्षित तालुक्यात आज संपूर्णता अभियानाचं उद्घाटन करण्यात आलं. आरोग्य आणि पोषण या क्षेत्रात सर्वांनी एकत्र येऊन काम करावं अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी दिल्या. या क्षेत्रात काम करणाऱ्या आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि एएनएम यांच्या कामाचं जिल्हाधिकाऱ्यांनी कौतुक केलं. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थितांनी आकांक्षित तालुक्याला सक्षम आणि समृद्ध करण्याची प्रतिज्ञा केली.

**हिंगोली** तालुक्यातही जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या उपस्थितीत संपूर्णता अभियानाला सुरुवात झाली. सर्व निकष मुदती आधीच पूर्ण करण्यात येतील असं जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितलं. तसंच तालुक्यातल्या सर्व ग्रामपंचायतींना ५ आणि ६ जुलै रोजी ग्रामसभा घेण्याचे निर्देश दिले.

**पालघर** जिल्ह्यातल्या डहाणू आणि जव्हार तालुक्यात आज संपूर्णता अभियानाला सुरुवात झाली. डहाणू इथं पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांच्या उपस्थितीत सर्वांनी संपूर्णता अभियान यशस्वीरित्या पार पाडण्याची प्रतिज्ञा घेतली.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज पहिल्यांदाच ८० हजाराच्या उच्चांकी पातळीवर बंद झाला. कालच सेन्सेक्सनं ही पातळी ओलांडली होती, मात्र दिवसअखेर तो या पातळीखाली बंद झाला होता. आज दिवसअखेर ६३ अंकांची

वाढ नोंदवत तो ८० हजार ५० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ३०२ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकून आज बार्बाडोसहून मायदेशी परतलेल्या भारतीय संघानं दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. प्रधानमंत्र्यांनी क्रिकेट संघाला शाबासकी दिली आणि संपूर्ण देशाला त्यांचा अभिमान वाटत असल्याचं सांगितलं. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी नवी दिल्ली विमानतळावर विश्वविजेत्या संघाचं स्वागत केलं. मोठा जनसमुदाय विमानतळाबाहेर उपस्थित होता.

हा विश्वविजेता संघ आज संध्याकाळी मुंबईत पोचला. विमानतळावर अग्निशमन दलाकडून त्यांच्या विमानावर पाण्याचे फवारे मारून त्यांचं स्वागत करण्यात आलं.  विमान कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कर्णधार रोहित शर्मा याच्या हातून केक कापून या क्रिकेटपटूंचं कौतुक केलं. भारतीय संघाची विजयी मिरवणूक यानंतर निघणार आहे. हजारो क्रिकेटप्रेमींनी मरीन ड्राइव्हवर गर्दी केली आहे. यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली आहे.

<><><><><>

नाशिक जिल्ह्याच्या निफाड तालुक्यातल्या सर्वेश कुशारे याची उंच उडी क्रीडा प्रकारात पॅरिस ऑलिम्पिकसाठी निवड झाली आहे. हरयाणात पंचकुला इथं झालेल्या पात्रता स्पर्धेत सर्वेशनं २ पूर्णांक २५ शतांश मीटर इतकी उंच उडी मारत प्रथम क्रमांक पटकावला. ऑलिम्पिकच्या पात्रतेसाठीचा निकष त्यानं पार केला. त्याबरोबरत सर्वेशनं जागतिक क्रमवारीतही ४२ वं स्थान मिळवलं आहे. उंच उडी स्पर्धेत पात्रता फेरीतून निवड झालेला सर्वेश महाराष्ट्रातला पहिला खेळाडू ठरला आहे.

<><><><><>

खटल्यांचा जलद निपटारा करण्यासाठी देशभरातल्या सर्व न्यायालयं आणि न्यायाधिकरणांमधे उत्तम पायभूत सुविधांची गरज सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी व्यक्त केली आहे. ते आज मुंबईत रोखे अपीलीय न्यायाधिकरणाच्या नव्या कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर दूरदर्शनशी बोलत होते. प्रत्यक्षातल्या तसंच आभासी माध्यमातून होणाऱ्या कामकाजासाठीही या सुविधांची गरज आहे, असं त्यांनी सांगितलं. गेल्या काही वर्षात भांडवली बाजाराचा बहुस्तरीय विस्तार झाला आहे. हे लक्षात घेता गुंतवणूकदारांचं हितरक्षण करण्यासाठी न्यायाधिकरणाच्या अतिरिक्त शाखा असणं आवश्यक आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

येत्या दोन दिवसांमधे कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात घाट भागात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुंबई शहर आणि  उपनगरात उद्यापर्यंत अधनूमधून मध्यम पाउस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//